# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

**विषय - जाहिरात क्रमांक २३/२०२४ व जाहिरात क्रमांक २४/२०२४ साठी प्राप्त होणाऱ्या अर्जांबाबत सादर करावयाच्या जोडपत्रांच्या प्रतींबाबत...**

शिवाजी विद्यापीठांमध्ये विविध शिक्षकीय पदे भरण्यासाठी जाहिराती प्रसिद्ध करण्यात आल्या असून सर्व जाहिरातींची ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत दि. ११ नोव्हेंबर, २०२४ व हार्ड कॉपी जमा करण्याची मुदत २५ नोव्हेंबर, २०२४ अशी होती. त्यापैकी जाहिरात क्रमांक २३/२०२४ व जाहिरात क्रमांक २४/२०२४ साठी ही मुदत, ऑनलाईन अर्ज करण्यासाठी दि. ३० नोव्हेंबर, २०२४ व हार्ड कॉपी जमा करण्यासाठी १० डिसेंबर, २०२४ पर्यंत वाढवण्यात आली आहे. सर्व जाहिरातीमध्ये प्रसिद्ध केलेल्या पदांसाठीचे विहित नमुन्यातील अर्ज आवक विभागाकडून प्रत्येकी सहा प्रतींमध्ये या विभागाकडे प्राप्त होत आहेत. सदर अर्जांची अवलोकन केले असता असे निदर्शनास आले आहे की, एकच उमेदवार एकाच संवर्गासाठी म्हणजेच एकाच पोस्ट कोड साठी त्याच्या वैयक्तिक प्रवर्गातून व खुल्या प्रवर्गातून असे दोन वेळा अर्ज सादर करीत आहेत. त्यामुळे प्रशासनाकडे प्राप्त होणाऱ्या कागदपत्रांची संख्या वाढत असल्याचे दिसून येते.

याबाबत सदर परिपत्रकाद्वारे आदेशावरून कळविण्यात येते की, वरील जाहिरात क्रमांक २३ व जाहिरात क्रमांक २४ च्या अनुषंगाने शुद्धिपत्रकाद्वारे, हार्ड कॉपी सादर करण्याची मुदत दि. १० डिसेंबर, २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे, त्यामुळे सदर जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांसाठी अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. एकाच पोस्ट कोड साठी व त्यातील एकाच विषयासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी जर त्यांना त्यांच्या मूळ जातीच्या प्रवर्गातून व खुल्या प्रवर्गातून अर्ज सादर करावयाचा असेल तर त्यांनी त्यांचा ऑनलाईन Application चा अर्ज प्रत्येकी सहा प्रतीत सादर करावा व त्यांना ज्या प्रवर्गातून प्राधान्यक्रम द्यायचा आहे, त्या प्रवर्गासाठी अनुषंगिक कागदपत्रे सहा प्रती जोडावीत.

२. तसेच दुसरा प्राधान्यक्रम असलेल्या प्रवर्गासाठी त्यांनी फक्त ऑनलाईन अर्जाची प्रिंट सहा प्रतीमध्ये काढून, संबंधित उमेदवार हा इतरत्र / अन्य पदावर कार्यरत असेल तर आवश्यकतेनुसार विहित मार्गाने चेक लिस्ट, Declaration, Appendix II (As per G.R. dated 8 March, 2019) Table 2 (for Advt. No. 23/2024) Table 3 A (for Advt. No. 24/2024), Form A (छोट्या कुटुंबाचे प्रमाणपत्र) संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्यानुसार विहित अनुषंगिक कागदपत्रे स्वाक्षरीसह सादर करावे, जेणेकरून त्यांना अधिकची झेरॉक्स कागदपत्रे सादर करावी लागणार नाहीत.

पान क्र. २ वर...

३. तथापि, जे उमेदवार सदर परिपत्रकाचा लाभ घेऊ इच्छितात त्यांनी त्यांच्या प्राधान्यक्रमबाबत सोबत प्रमाणे स्वयंघोषणापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

४. तथापि, जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे एकच उमेदवार दोन वेगवेगळ्या पोस्ट कोड साठी किंवा विषयासाठी अर्ज करणार असेल तर त्यांनी प्रत्येकी सहा प्रतीमध्ये अर्ज व जोडपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

५. तसेच सदर परिपत्रक हे निर्गमित होण्यापूर्वी ज्या उमेदवारांचे कार्यालयास अर्ज प्राप्त झाले आहेत, त्यांना सदर परिपत्रक लागू राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**जा.क्र. शिवाजी विद्या./आस्थापना/पीजी/** 4595
**दि.** 0 4 DEC 2024

**(डॉ. व्ही. एन. शिंदे)**
**कुलसचिव**

**प्रति,**

१. मा. कुलगुरु / मा. प्र-कुलगुरु कार्यालय, मा. वित्त व लेखाधिकारी, मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ.
२. मा. अधिष्ठाता सर्व विद्याशाखा, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
३. सर्व प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
४. सर्व अधिविभागप्रमुख/ संचालक / समन्वयक पदव्युत्तर / पदवी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
५. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख, संचालक - विद्यार्थी कल्याण, सर्व रेक्टर्स, कायदा अधिकारी
६. समन्वयक, इंटरनेट विभाग - INTRANET तसेच संकेतस्थळावर प्रसिध्दी करीता.
७. आवक विभाग

## स्वयं घोषणा पत्र

(प्राधान्यक्रमाबाबत विद्यापीठ प्रशासनाकडून निर्गमित केलेले जा.क्र. शिवाजी विद्या./आस्थापना/पीजी/ दि. नुसार उमेदवाराने द्यावयाचे स्वयं घोषणा पत्र)

मी, डॉ./श्री./श्रीमती ................................................................... जाहिरात क्र. ...................... मधील पोस्ट कोड ........................ येथील ................. या पदासाठी व ....................................... या विषयासाठी माझ्या मूळ प्रवर्गातून ............................... तसेच खुल्या प्रवागार्तून असे दोन्ही मधून अर्ज केला आहे. माझा Online Application ID No. .................................. हा आहे.

मी, या द्वारे घोषित करतो / करते की, माझ्या जातीचा मूळ प्रवर्ग ............................................... हा असून सोबत प्रमाणे जात प्रमाणपत्र व अनुषंगिक कागदपत्रे जोडली आहेत. मी वरीलप्रमाणे दोन्ही प्रवर्गातून अर्ज केलेल्या पदासाठी माझ्या अर्जाचा प्राधान्यक्रम हा माझ्या मूळ जातीच्या प्रवर्गातून / खुल्या प्रवर्गातून केलेल्या अर्जाशी गृहीत धरण्यात यावा. सदर अर्जासोबत विहित **Check List** नुसार अनुषंगिक कागदपत्रे सहा प्रतीत जोडली आहेत. तसेच दुसरा प्राधान्यक्रम हा माझ्या मूळ जातीच्या प्रवर्गातून / खुल्या प्रवर्गातून असल्याने परिपत्रकातील मुद्दा क्र. २ प्रमाणे विहित नमुन्यासह Online Application च्या व अनुषंगिक कागदपत्रांसह विहित प्रती सादर / अग्रेषित करीत आहे, असे वरील प्रमाणे मी माझे घोषणापत्र याद्वारे सादर करीत आहे.

ठिकाण --------------- अर्जदाराची सही ---------------------------

दिनांक --------------- अर्जदाराची नाव ---------------------------